**नियमीत दिवाणी दावा क्र.२०/२०१८**

**निशाणी ६७ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.३ यांनी त्यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्दबातल करुन त्यांची कैफियत दावेचे कामी दाखल करुन घेणेसाठी सादर करणेत आला आहे. प्रतिवादी क्र.३ यांनी असे कथन केले आहे की, सन २०२० सालामध्ये कोरोणाच्या आजारामुळे त्यांना न्यायालयामध्ये उपस्थित राहता आले नाही तसेच त्यांना महत्वाची कागदपत्रे देखील मिळालेली नाहीत. प्रतिवादीचे म्हणणे दाव्यामध्ये दाखल करुन घेतलेनाहीतर त्यांचे आतोनात नुकसान होणार आहे तसेच त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणार नाही त्यामुळे त्यांची कैफियत दाखल करुन घेण्याची विनंती केलेली आहे.

२. सदर अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल केलेले असुन असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ हे सन २०१८ साली दाव्यामध्ये दाखल झालेले आहेत. त्यांना पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी वेळेत आपली कैफियत सादर केलेली नाही. त्यामुळे दिनांक २८/०९/२०१८ रोजीचा त्यांचे विरुध्द विनाकैफियत आदेश झालेला आहे. त्यामुळे सन २००८ ते २०२० सालापर्यंत कैफियत देण्यासाठी विलंब का झाला याबाबत कोणतेही समाधानकार असे स्पष्टीकरण दिले नसल्यामुळे त्यांचा अर्ज नामंजूर करावा व अर्ज मंजूर झाल्यास रक्कम रु. ५०००/- इतका कॉस्ट करावा अशी मागणी त्यांनी केली आहे.

३. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. युक्तीवादादरम्यान ही गोष्ट निदर्शनास आली की, प्रतिवादी क्र.१ यांचा मृत्यु दावा चालु असताना झालेला आहे. प्रतिवादी क्र.३ यांचे विरुध्द बरेच दिवसपुर्वी विनाकैफियत आदेश झाल्याचे दिसुन येते, मात्र न्यायाचे हितास्तव दोन्ही पक्षकारांची बाजु ऐकणे गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ यांची कैफियत दाव्यात दाखल

करुन घेणे तसेच प्रतिवादी क्र.३ यांना नैसर्गिक न्यायतत्वाची संधी देणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये कोराणाच्या महामारीमुळे लोक हालाकीचे जीवन जगत आहेत. यामुळे प्रतिवादीच्या अर्जाला कोणत्याही प्रकारचा कॉस्ट करणे मला उचीत वाटत नाही. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ यांच्या विरुध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्दबातल करण्यात येतो.

स्वाक्षरी/-

दिनांक - ०७/०७/२०२१

(वि.द.पाटील)

सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, कडेगांव